# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.01.2026** **वारःगुरुवार**

---

1. देशासह जगभरात सरत्या वर्षाला निरोप देत आतषबाजीसह नव्या वर्षाचे स्वागत
2. नाशिक सोलापूर अक्कलकोट सहा पदरी महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी
3. राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठी 33 हजार 606 उमेदवारी अर्ज दाखल
4. बनावट बियाणं आणि कीटकनाशक कंपन्यांवर अंकुश ठेवणारे नवे कायदे करणार- केंद्रीय कृषी मंत्री आणि
5. डीआरडीओच्या दोन प्रलय क्षेपणास्त्रांचे यशस्वी प्रक्षेपण

**नववर्ष स्वागत**

सरत्या वर्षाला निरोप देत नव्या वर्षाचे स्वागत देशभरात उत्साहात आणि आनंदात करण्यात आले. बहुतांश ठिकाणी प्रार्थना, स्नेहमिलन आयोजित करण्यात आले होते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस आणि सुरक्षा दलही सज्ज होते. दिल्लीत इंडिया गेट सारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अतिथंडीच्या रात्रीही नागरिक नववर्षाच्या स्वागतासाठी एकत्रित आले होते. गोवा, मध्य प्रदेश, तेलंगणामध्ये स्थानिक आणि पर्यटकांनी फटाक्यांची आतषबाजी केली तर मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज स्थानक रोषणाई उजळून गेले होते. अमृतसरमध्ये श्री हरमंदीर साहिबमध्ये नव्या वर्षाच्या स्वागत प्रार्थनेने करण्यात आले तर हिमाचल प्रदेश, जम्मूकाश्मीर मध्ये बर्फाची चादर पांघरलेल्या निसर्गरम्य वातावरणात गतवर्षाला निरोप देण्यात आला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देश परदेशातील नागरिकांना नवनवर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नवे वर्ष नवी ऊर्जा आणि सकारात्मक बदलाचे प्रतीक असून, आत्मचिंतन आणि नवसंकल्पांची संधी म्हणून त्याकडे पाहाता येईल असे म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही देशवासियांना उत्तम आरोग्य, समृद्धी आणि प्रयत्नांना यश मिळू देत अशा शब्दांत नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाजात शांतता आणि आनंद नांदू यासाठीही त्यांनी प्रार्थना केली आहे.

**विश्व नववर्ष**

जगभरातही नववर्षाचे स्वागत फटाक्यांची आतषबाजी, स्नेहमीलन कार्यक्रमांनी करण्यात आले. पॅसिफिक महासागरातील किरीबाटी हा देश नववर्षात प्रवेश करणारा पहिला देश ठरला. न्यूझीलंडमधील 787 फूट उंच स्काय टॉवरवरून नेत्रदीपक आतषबाजी करत नववर्षाचे स्वागत करण्यात आले. ऑस्ट्रेलियामध्ये हार्बर ब्रिजवरील आकाश आतषबाजीने उजळून निघाले.

**मंत्रीमंडळ निर्णय**

नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. 374 किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी 19 हजार 142 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदराजवळ दिल्ली-मुंबई महामार्गाला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्गावर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी इथं समृद्धी महामार्गाला जोडण्याचं प्रस्तावित आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यामुळे प्रवासाचा 17 तासांचा वेळ वाचणार असून 201 किलोमीटर अंतर कमी

होण्याची अपेक्षा आहे. नाशिक- अक्कलकोट मार्गामुळे औद्योगिक परिसरात येणाऱ्या -जाणाऱ्या मालाची दळणवळण क्षमता वृद्धिंगत होणार आहे.

**<u>प्रगती</u>**

माहिती आणि तंत्रज्ञानावर आधारित प्रगती या बहुआयामी मंचाची 50 वी बैठक काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षते खाली पार पडली. या बैठकीदरम्यान पंतप्रधानांनी रस्ते, रेल्वे, वीज, जलसंपदा आणि कोळसा या क्षेत्रांतील पाच महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांचा आढावा घेतला. हे प्रकल्प पाच राज्यांशी संबंधित असून त्यांची एकंदर अंदाजित किंमत 40 हजार कोटी रुपयांहून अधिक आहे. गेल्या दशकात प्रगती मंचाच्या नेतृत्वाखालील परिसंस्थेमुळे 85 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या प्रकल्पांना गती देण्यास मदत झाली असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं. या बैठकीमध्ये पंतप्रधानांनी पीएम श्री योजनाचाही आढावा घेतला. शालेय शिक्षणाच्या दृष्टीनं महत्त्वाकांक्षी असलेल्या, सर्वसमावेशक आणि भविष्यावेधी पी एम श्री योजनेवर देशातील सर्व मुख्य सचिवांना बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश मोदी यांनी दिले.

**<u>मनपा निवडणूक</u>**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगानं 29 महानगरपालिकांमध्ये दाखल झालेल्या एकंदर उमेदवारी अर्जांबाबत माहिती दिली. त्यानुसार राज्यातील 29 महानगरपालिकांच्या एकंदर 893 प्रभागांमधून 2 हजार 869 जागांसाठी 33 हजार 606 उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. उद्या म्हणजे 2 जानेवारीला दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 3 जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. येत्या 15 जानेवारीला मतदान आणि 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान धुळे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येकी दोन उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

**<u>शिवराजसिंह चौहान-अहिल्यानगर</u>**

बनावट बियाणे आणि कीटकनाशक कंपन्यांवर अंकुश ठेवण्यासाठी केंद्र सरकार नवीन कायदे आणणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. शिवराजसिंह चौहान कालपासून राज्याच्या दौऱ्यावर आहेत; काल त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात बाभळेश्वर इथं शेतकरी मेळाव्यात मार्गदशन केलं. राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत केंद्राने 367 कोटी रुपयांचा निधी वितरित केल्याची माहितीही चौहान यांनी दिली. शिवराज सिंह चौहान यांनी काल रात्री शिर्डीच्या साईबाबा मंदिरात दर्शन घेतलं. उद्या नाशिकमध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात होणाऱ्या एका कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत.

**<u>डीआरडीओ</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच डीआरडीओने काल ओडिशाच्या किनारपट्टीवरून दोन प्रलय या क्षेपणास्त्राचे यशस्वी प्रक्षेपण केले. क्षेपणास्त्रांच्या वापराच्या मूल्यांकन चाचणीचा भाग म्हणून याचे प्रक्षेपण करण्यात आले. चांदीपूर इथून प्रक्षेपित केलेली ही क्षेपणास्त्रे नियोजित मार्गाने गेली आहेत. प्रलय हे स्वदेशी बनावटीचे, जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे दीडशे ते पाचशे किमी पल्ल्याचे बॅलास्टिक क्षेपणास्त्र आहे.

**<u>व्याजदर</u>**

नव्या वर्षात, एक जानेवारीपासून सुरू होणाऱ्या चौथ्या तिमाहीसाठी अल्पबचत योजनांवरील व्याजदर जैसे थे ठेवण्यात आल्याची माहिती अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने दिली आहे. या संदर्भात विभागाने अधिसूचना

काढली असून त्यामध्ये सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीपीएफचा व्याजदर 7 पूर्णांक 1 दशांश टक्के तर राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रांचा व्याजदर 7 पूर्णांक 7 दशांश टक्के कायम ठेवण्यात आला आहे. ज्येष्ठ नागरिक बचत योजना आणि सुकन्या समृद्धी योजना यांचा दर 8 पूर्णांक 2 दशांश टक्के कायम राहिल.

**आर्थिक संपत्ती**

दावेदाराविना असलेल्या आर्थिक मालमत्तांचा शोध घेण्याच्या दृष्टीने वित्तीय सेवा विभागाने तीन महिन्यांच्या कालवधीसाठी राबवलेली आपकी पूंजी आपका अधिकार ही देशव्यापी मोहीम पूर्ण झाली. या मोहिमेदरम्यान देशातल्या 748 जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने सुनियोजित शिबिरे आयोजित करण्यात आली तसेच दावे निकाली काढण्याच्या प्रक्रियेविषयी सार्वजनिक जागरुकता आणि समज वाढल्याचे केंद्रीय अर्थ मंत्रालयाने म्हटले आहे. वित्तीय प्रणालीचे फायदे शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोचवणे आणि नागरिकांना सक्षम करणे हा मोहिमेचा उद्देश असल्याचंही मंत्रालयाने म्हटले आहे.

**तंबाखूकर**

नववर्षात एक फेब्रुवारीपासून तंबाखूच्या उत्पादनांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क आणि पान मसाल्यावर नवीन उपकर आकारला जाणार आहे. हे कर वस्तू आणि सेवा करा व्यतिरिक्तचे कर असतील. पान मसाला, सिगारेट, तंबाखू आणि तत्सम उत्पादनांवर 40 टक्के जीएसटी दर लागू होईल, तर बिडीवर 18 टक्के वस्तू आणि सेवा कर लागेल. याव्यतिरिक्त, पान मसाल्यावर आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर आकारला जाईल, तर तंबाखू आणि संबंधित उत्पादनांवर अतिरिक्त उत्पादन शुल्क आकारले जाईल.

**मादक तस्करी**

अंमली पदार्थ तस्करी नियंत्रण विभागाने काल बंगळुरु इथून अंमली पदार्थाच्या तस्करीचं  आंतरराष्ट्रीय जाळे उद्ध्वस्त केले. या कारवाईत, 8 कोटी रुपये मूल्यांची एकंदर 160 किलोग्राम अमली पदार्थांची पाने जप्त केली. इथियोपियातून केनियामार्गे येणाऱ्या आंतरराष्ट्रीय मार्गाने हा पदार्थ भारतात आणला जात असल्याचं प्राथमिक तपासातून निष्पन्न झालं आहे. चहासारख्या नियमित व्यावसायिक वस्तूंच्या रूपात लपवून आंतरराष्ट्रीय टपाल आणि कुरिअर प्रणालीचा वापर करून आयात केली जात असल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे.

**बांग्लादेश-जयशंकर**

बांग्लादेशच्या माजी पंतप्रधान बेगम खालिदा झिया यांच्या पार्थिवावर काल ढाका इथं सरकारी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यासाठीच्या शेवटच्या नमाजाला हजारो नागरिकांचा जमाव होता. झिया याचं मंगळवारी दीर्घ आजारानं निधन झालं. भारताच्या वतीनं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या वेळी उपस्थित होते. झिया यांच्या मुलाची भेट घेऊन त्यांनी भारताच्या भावना व्यक्त करत सांत्वन केले.

**खोखो**

बंगळुरूच्या अटलबिहारी वाजपेयी स्टेडियमध्ये कालपासून 44 व्या कनिष्ठ राष्ट्रीय खो खो अजिंक्यपद स्पर्धांना सुरुवात झाली. देशभरातून हजार खेळाडू यामध्ये सहभागी झाले आहे. उद्घाटनाच्या कालच्या दिवशी एकंदर चाळीस सामने खेळवले गेले. चार जानेवारीला अंतिम फेरीचे सामने होणार आहेत. दरम्यान 58व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो खो अजिंक्यपद स्पर्धा तेलंगणामध्ये 11 ते 15 जानेवारीदरम्यान होणार आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार**